श्री. किरण गित्ते (भा.प्र.से.),जिल्हाधिकारी अमरावती यांचे कार्यालय

रा.मा.क्र. एन.ए.पी.-३४/पेठ अमरावती/ ५६ /२०१६-२०१७

अर्जदार :- पद्म बिल्डर्स तर्फे पार्टनर,
श्री. गोपाल सत्यनारायण करवा अधिक २
रा. अमरावती

विरुध्द

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन

आदेश
(पारीत दिनांक :-१९/०९/२०१६)

अर्जदार पद्म बिल्डर्स तर्फे पार्टनर, श्री. गोपाल सत्यनारायण करवा अधिक २ रा. अमरावती यांनी अर्ज सादर करुन जिल्हाधिकारी, अमरावती यांचे फायलावरील रा.मा.क्र. एन.ए.पी.-३४/पेठ अमरावती/९९/२०१५-२०१६ मधील दिनांक १६/५/२०१६ व रा.मा.क्र.एनएपी-३४/पेठ अमरावती/१३३/२००९-१० मधील आदेश दिनांक २७/८/२०१० चे आदेशानुसार मौजे पेठ अमरावती येथील शेत स.नं. ६४ मधिल भुखंड क्र. १ व ६ मधील एकुण क्षेत्रफळ १३२१.७० चौ.मी. अर्जदार यांचे नांवे आहे. तसेच प्रकरणात गांव नमुना ६/२ दाखल आहे. अर्जदार यांनी वरील भुखंडाचे एकत्रिकरण करुन मिळण्यास विनंती केली आहे.

प्रकरणात तहसिलदार अमरावती यांचे २६/९/२०१६ चे पत्रासह मंडळ अधिकारी अमरावती यांचा अहवाल प्रकरणात दाखल आहे.

सहायक संचालक नगर रचना, महानगरपालिका अमरावती यांनी त्यांचे पत्र क्रमांक/अमनपा/ससंनर/उप.प्र./१०७८/२०१६ दिनांक १७/९/२०१६ चे आदेशान्वये भुखंडाचे एकत्रिकरणास परवानगी दिली असल्याने त्यांचे उक्त प्रत्रातील अटीस अधिन राहुन उक्त राजस्व मामल्यामधील आदेशातील भुखंड एकत्रिकरणाची अट शिथील करुन व इतर अटी व शर्ती कायम ठेवुन महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ (१) नुसार वरील नमुद भुखंड एकत्रिकरण करण्याचे परवानगी नंतर भुखंडाचे क्षेत्र पुढील प्रमाणे राहील.

जिल्हाधिकारी यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
अमरावती